CMYK

सुविचार

भक्तीचा प्रकाश जीवनात आनंद आणि समृद्धी देतो

दैनिक
# आरंभ मराठी
www.arambhmarathi.com

■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 150 ■ शुक्रवार, दि. 11 जुलै 2025 ■ RNI NO -2023/90078 ■ पाने 04



# आमदार संजय गायकवाड आता शाळकरी मुलांच्या जीवाशी खेळणाऱ्या ठेकेदारांच्या कानाखाली जाळ काढणार का..?

## जिल्ह्यातील पाच शाळांमध्ये पोषण आहारात अळ्या

## पालकांमध्ये संताप,ठेकेदाराला प्रशासनाची नोटीस

आरंभ मराठी | धाराशिव

जिल्ह्यातील पाच शाळांमध्ये शालेय पोषण आहारातील चॉकलेट व बिस्किट पुड्यामध्ये अळ्या आढळल्याने पालक संतप्त झाले आहेत. आमदार निवासात उपहारगृहात निकृष्ट दर्जाचे अन्न दिल्यामुळे उपहारगृहातील कर्मचाऱ्यांना मारहाण करणाऱ्या आमदार संजय गायकवाड आता विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळणाऱ्या अशा ठेकेदारांच्या कानाखाली जाळ काढणार का..?,असा सवाल विचारला जातोय. शालेय पोषण आहारात अळ्या निघण्याचा प्रकार उमरगा तालुक्यातील चार आणि धाराशिव तालुक्यातील एका शाळेत उघडकीस आला आहे.

अन्य शाळेत विद्यार्थ्यांना पोषण आहार वाटप झाला आहे.दरम्यान, हा प्रकार समोर आल्यानंतर शिक्षण विभागाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून, पुरवठादार कंपनीला नोटीस बजावून पुरवठा न करण्यास सांगितले आहे. हे प्रकरण शिक्षण विभागाने राज्य सरकारला कळवले असून, यातील दोषींवर कारवाई करण्यात येईल असे शिक्षण विभागाने सांगितले आहे. जिल्ह्यातील पाच शाळांमध्ये चॉकलेट व बिस्किटात अळ्या निघाल्याची प्रकरणे समोर आली आहेत. त्यानंतर पुरवठादार कंपनीला पुढील लॉटचा पुरवठा तत्काळ थांबवण्याचे आदेश शिक्षण विभागाने दिले आहेत.



राज्य शासनानेही संपूर्ण राज्यात चॉकलेट व बिस्किट पुड्याची तपासणी करावी अशी विनंती करणारे पत्र शिक्षण विभागाने राज्य सरकारला लिहिले आहे. धाराशिव जिल्ह्यात दोन दिवसात पाच शाळेत शालेय पोषण आहाराच्या दर्जाबाबत तक्रारी मिळाल्या होत्या. यामध्ये उमरगा तालुक्यातील बलसूर येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व तुरोरीच्या व येळीच्या शाळेत ही मिलेट बार चॉकलेटमध्ये अळ्या निघाल्या होत्या. तर धाराशिव तालुक्यातील पिंपरी येथील शाळेत बिस्कीट पुड्यामध्ये अळ्या आढळून आल्या आहेत.



जिल्ह्यातील शाळांना चॉकलेचा पुरवठा गुणिना सर्व्हिसेस या कंपनीकडून केला जात असल्याची माहिती समोर आली आहे. या कंपनीला नोटीस बजावण्यात आली आहे. कंपनीने समाधानकारक उत्तर न दिल्यास या कंपनीवर कारवाई करणार असल्याचे शिक्षण विभागाने संगीतले आहे. दरम्यान या घटनेची गंभीर दखल मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष यांनीही घेतली असून, शाळेतील केंद्र प्रमुखांनी शालेय आहाराची योग्यप्रकारे खात्री करूनच आहार विद्यार्थ्यांना द्यावा अशा सूचना दिल्या आहेत.



### पुरवठादार कंपनीला नोटीस बजावली आहे

शालेय विद्यार्थ्यांना दिलेल्या चॉकलेट आणि बिस्किटात अळ्या असल्याच्या काही तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यानुसार केंद्र प्रमुखांना चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. पुरवठादार एजन्सीला नोटीस बजावण्यात आली असून, सध्या पुरवठा करू नये असे सांगितले आहे. शिक्षकांनी या पदार्थांची खात्री करूनच विद्यार्थ्यांना खाऊ द्यावा अशा सूचना दिल्या आहेत. या प्रकाराची माहिती राज्य सरकारला कळवली आहे.

**नागेश मापारी**
शिक्षणाधिकारी(प्रा.)

# धाराशिव तालुक्यातील ५५ गावात महिलाराज

## ११० गावांची सरपंचपदाच्या आरक्षणाची सोडत जाहीर

आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या सरपंच पदासाठी आरक्षण सोडत गुरुवारी (दि.१०) जाहीर करण्यात आली. यावेळी तालुक्यातील ११० गावांची आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली. यापूर्वी १६ एप्रिल रोजी काढण्यात आलेली आरक्षण सोडत रद्द करण्यात आल्यामुळे राज्य सरकारने पुन्हा एकदा आरक्षण सोडत काढण्याचे आदेश जिल्हा प्रशासनाला दिले होते. त्यानुसार ही आरक्षण सोडत गुरुवारी जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात पार पडली. यावेळी प्राधिकृत अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख, तहसीलदार डॉ. मृणाल जाधव आणि नायब तहसीलदार (निवडणूक) जी. एस. स्वामी यांची उपस्थिती होती. यावेळी तालुक्यातील ११० गावांची आरक्षण सोडत करण्यात आली. त्यापैकी



५५ जागांवर महिला सरपंच असणार आहेत. यापूर्वी १६ एप्रिल रोजी काढण्यात आलेल्या आरक्षण सोडतीत फारसा फरक पडलेला नाही. फक्त पुरुष आणि महिलांची काही ठिकाणी अदलाबदल झाल्यामुळे काही ठिकाणी जल्लोष साजरा करण्यात येत होता तर काही ठिकाणी चेहरे हिरमुसलेले दिसत होते. या आरक्षण सोडतीत अनुसूचित जातीसाठी १९, अनुसूचित जमातीसाठी ४, नागरिकांचा मागास प्रवर्ग ३० आणि सर्वसाधारण गटासाठी ५७ जागा सुटल्या आहेत. यामध्ये अनुसूचित जातीसाठी ९ महिला, अनुसूचित जमातीसाठी २ महिला, ओबीसी साठी १५ महिला तर जनरल साठी २९ महिलांचे आरक्षण सुटले.

**तालुक्यातील ग्रामपंचायती व सुटलेले आरक्षण**

**अनुसूचित जाती**
मुळेवाडी, सकनेवाडी, कोळेवाडी, विठ्ठलवाडी, रामवाडी, शेकापूर, शिंगोली, वरवंटी, जुनोनी, बरमगांव (बु.)

**अनुसूचित जाती महिला**
गोपाळवाडी, पळसवाडी, कावळेवाडी, जहागिरदारवाडी, बुकनवाडी, कोंबडवाडी, पवारवाडी, आळणी, किणी.

**नागरिकांचा मागासवर्ग महिला**
आंबेहोळ, वडगांव (सि.), खामगाव, केशेगाव, पिंपरी, सांजा, चिलवडी, पाडोळी (आ.), उपळा (मा.), काजळा, आरणी, हिंगळजवाडी, वाखरवाडी, घाटंग्री, कुमाळवाडी.

**अनुसूचित जमाती**
गावसुद, मोहतरवाडी

**अनुसूचित जमाती महिला**
कौडगाव, बावी

**नागरिकांचा मागास प्रवर्ग**
पोहनेर, गडदेवधरी, उमरे गव्हाण, रुई (ढोकी), कामेगाव, येडशी, तावरजखेडा, खामसवाडी, गोवर्धनवाडी, खानापूर, नांदुर्गा, सांगवी, तेर, अनसुर्डा, वाणेवाडी

**सर्वसाधारण**
बेगडा, देवळाली, बोरखेडा, कोलेगांव, डकवाडी, येवती, गौडगांव, भंडारी, रुईभर, कसबे तडवळा, वाघोली, महाळंगी, लासोना, टाकळी ढोकी, समुद्रवाणी, बामणी, बोरगांव राजे, वरुडा, आंबेजवळगा, ढोकी, उत्तमी कायापूर, भानसगांव, सोनेगांव, धुत्ता, तुगांव, सुंभा, सारोळा (बु.), पाटोदा

**सर्वसाधारण महिला**
भांडारवाडी, धारूर, दारफळ, खेड, पळसप, करजखेडा, तोरंबा, टाकली बें., कनगरा, कौडगांव बार्शी, नितळी, सुर्डी, गोरेवाडी, भिकार सारोळा, ईर्ला, ताकविकी, राजुरी, दाऊतपूर, जागजी, बेंबळी, आंबेवाडी, चिखली, मेंढा, बावी का., जवळे दु., वाडी बामणी, मेडसिंगा, कोंड, घुगी.

# पावणे पाच लाखांचा अवैध गुटखा जप्त

**उमरगा–** बस स्थानकावर तब्बल पावणे पाच लाख रुपयांचा अवैध गुटखा जप्त करण्यात आला असून, यावेळी परराज्यातील दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की, आरोपी दिपक राजेश्वर दुगनी (रा. हैद्राबाद) आणि नरेंद्र राम स्वामी कनकमरा (रा. करीमनगर) या दोघांना दिनांक ४ जुलै रोजी रात्री साडेबारा वाजता उमरगा बसस्थानक येथे हैद्राबाद ते कोल्हापुर जाणाऱ्या बसमध्ये (क्र एमएच १४ के.क्यु ६६५०) महाराष्ट्रात प्रतिबंधीत केलेला गुटखा व तत्सव पदार्थ विकत असताना ताब्यात घेतले. यावेळी त्यांच्याकडून तंबाखु गोल्ड कंपनीचे ८० बॉक्स त्यात लहान पुड्या असा एकुण ४,८०,००० रुपये किंमतीचा माल जप्त करण्यात आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन दोन व्यक्तींविरुध्द कलम– १२३, २२३, २७४, २७५, भा.न्या.सं. सह अन्न सुरक्षा मानके अधिनियम कलम ५९ अन्वये उमरगा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

# जलद न्यायासाठी आज 'सस्ती अदालत'

**धाराशिव–**विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांनी शेतरस्ते व पाणंद रस्त्यांवरील अतिक्रमण मुक्त करण्यासाठी सामान्य शेतकऱ्यांना जलद व प्रभावी न्याय मिळावा, यासाठी 'सस्ती अदालत' उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमांतर्गत प्रत्येक तालुक्यात पंधरा दिवसांतून एकदा तहसील कार्यालयात सस्ती अदालत घेतली जाणार आहे. या निर्णयाच्या अनुषंगाने तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. दर महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या शुक्रवारी सस्ती अदालत भरवली जाणार असून,संबंधित विभागांचे अधिकारी या बैठकीत सहभागी होणार आहेत. धाराशिव तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी सस्ती अदालतीचे आज (दि.११) सकाळी ११ वाजता तहसील कार्यालय,धाराशिव येथे आयोजन करण्यात आले आहे. सर्व शेतकरी बांधवांनी या अदालतीस उपस्थित राहण्याचे आवाहन तहसीलदार डॉ. मृणाल जाधव यांनी केले आहे.

# तुळजापूर ड्रग्स प्रकरणात गंगणे यांना अखेर जामीन मंजूर

आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजापूर ड्रग्ज प्रकरणातील सेवन गटातील आरोपी असलेले विनोद गंगणे यांना उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजी नगर खंडपीठाने अखेर जामीन मंजूर केला आहे. या प्रकरणात आतापर्यंत हा तिसरा जामीन मंजूर झाला आहे. आतापर्यंत या प्रकरणात एकूण ३८ संशयित आरोपी निष्पन्न झाले असून, त्यामध्ये २२ जणांना अटक झाली आहे. तर १४ जण अद्यापही फरार आहेत. यामध्ये अगोदर आलोक शिंदे व उदय शेटे यांना अटकपूर्व जामीन मंजूर झाला होता. यानंतर या प्रकरणात अटक असलेले सेवन गटातील संशयित आरोपी विनोद गंगणे यांना जामीन मंजूर झाला असून, त्यामुळे त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. विनोद गंगणे हे तुळजापुरातील महत्त्वाचे राजकीय प्रस्थ असून त्यांच्या गोपनीय टीपद्वारेच पोलिसांनी या रॅकेटचा पर्दाफाश केला होता असे बोलले जाते. आगामी नगरपरिषद निवडणुकीच्या अनुषंगाने विनोद गंगणे यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असणार आहे. त्यामुळे त्यांना जामीन मिळाल्याने आगामी काळात तुळजापुरात मोठी राजकीय उलथापालथ होण्याची शक्यता आहे.

# कारची काच फोडून डीक्कीतील सव्वालाख रुपये लंपास सोनारीतील प्रकार

**अनाळा –**चार चाकी गाडीची काच फोडून डिक्कीत ठेवलेले १ लाख ३० हजार रुपये चोरट्याने लंपास केल्याची घटना परांडा तालुक्यातील सोनारी गुरुवारी दिवसाढवळ्या घडल्याने खळबळ उडाली आहे. चिंचपुर खु (ता.परंडा) येथील शत्रुघ्न रामा गरड यांचा दुध डेअरीचा व्यवसाय आहे. त्यामुळे दुध उत्पादक शेतकऱ्यांच्या पगारी करण्यासाठी त्यानी परंडा येथील एचडीएफसी बँकेतून १ लाख ३० हजार रुपये काढले व स्वतःच्या चार चाकी गाडीच्या ( एमएच २५ बी ए ४४७९) समोरील डिक्कीत ठेवले. जोडीदारासोबत सोनारीमार्गे ते चिंचपुरकडे निघाले होते. परंतु सोनारी फाट्यावर आले असता त्यांनी पाणी पिण्याच्या व जेवणाच्या उद्देशाने गाडी एका ढाब्यासमोर थांबवली. शत्रुघ्न गरड व जोडीदार ढाब्यामध्ये गेले. ही संधी साधुन मोटारसायकलवर आलेल्या चोरट्यांनी क्षणाचाही विलंब न लावता गाडीची काच फोडून डिक्कीत ठेवलेले एक लाख तीस हजार रुपये घेऊन पसार झाले. सदरील घटना सीसीटीव्हीत कॅमेरॉत कैद झाली आहे. परंतु गाडीचा नंबर स्पष्ट दिसत नसल्याने चोरांना शोधण्याचे पोलीसांसमोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे. याबाबत आंबी पोलीस ठाण्याचे सपोनि गोरक्ष खरड यांच्या मार्गदर्शनाखाली आंबी पोलीसांनी प्रकरणाचा तपाससुरुकेलाआहे.


# तुळजापूर, परांडा ड्रग्स प्रकरणी विधानसभा सभागृह दणाणले

## आमदार कैलास पाटील आक्रमक, पोलिस आणि आरोपींमध्ये संगनमत असल्याचा संशय, चौकशीची मागणी

आरंभ मराठी | धाराशिव

**तुळजापूर आणि परांडा ड्रग्ज प्रकरणी आमदार कैलास पाटील अधिवेशनात आक्रमक भूमिका घेत, तुळजापूर ड्रग्ज तस्करी गुन्हा नोंद झालेले अनेकजण मोकाट आहेत. पोलिसांची यंत्रणेवर त्यानी प्रश्नचिन्ह उभे केले तसेच अजूनही याबाबत समाधान होईल अशी कारवाई केली नसल्याची बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून देत पोलिस आणि आरोपींमध्ये संगनमत असल्याचा संशय व्यक्त केला.**

ड्रग्ज तस्करी गुन्ह्यात आरोपीवर मकोका लावण्यासाठी कायदा करणारे विधेयक मांडण्यात आले असून त्या चर्चेत सहभागी होऊन पाटील यांनी आपली भूमिका मांडली.आमदार कैलास पाटील म्हणाले, कमर्शियल सोबतच इंटरमिडीयेट (मध्यम) क्वांटिटी सापडल्यास व यापुर्वी ड्रग्ज तस्करीचे गुन्हे असतील तर त्यांच्यावरही मकोका लावावा अशी सूचना त्यांनी केली. मर्शियल क्वांटिटी (५० ग्रॅम पेक्षा जास्त) ड्रग्ज सापडले तर मकोका लावणार असे विधेयकात म्हटले आहे, गुन्हेगाराना हे नियम माहित असून ते तस्करी करताना ५० ग्रॅम पेक्षा जास्त होणार नाही, याची काळजी घेऊन कायद्यातुन सूटतील. त्यामुळे अशी अट न ठेवता वारंवार जे लोक गुन्हे करतात त्यांना सुद्धा मकोका अंतर्गत समाविष्ट केले जावे अशी सूचना आमदार पाटील यांनी केली. ड्रग्जच्या कारवाईत २ ग्रॅम पेक्षा कमी असेल तर स्मॉल अर्थात अल्प, २ ते ५० ग्रॅम पर्यंत इंटरमीडियेट मध्यम व ५० ग्रॅम पेक्षा जास्त असेल तर कमर्शियल व्यवसाय असे ३ प्रकार आहेत. ड्रग्ज तस्कर यांना हे माहिती आहे. त्यामुळे ते ५० ग्रॅम पेक्षा जास्त ठेवत नाहीत. राज्यात ११ हजार गुन्हे कमर्शियल प्रकारचे आहेत व ६३ हजार अल्प प्रमाणाचे आहेत. वारंवार तेच लोक गुन्हे करतात त्यांना



सुद्धा मकोका अंतर्गत समाविष्ट करावे अशी मागणी पाटील यांनी मांडली. महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी देवीच्या तुळजापूर येथे अनेक वर्षापासुन ड्रग्ज तस्करी सुरु होती. पोलिसांनी १४ फेब्रुवारीला ५९ पुड्या ड्रग्ज पकडले त्याचे वजन ४५ ग्रॅम होते, त्यानंतर दुसऱ्या गुन्ह्यात ४ मार्चला १० ग्रॅम वजनाच्या १७ पुड्या व ५ मार्चला ८ ग्रॅम वजन असलेल्या १३ पुड्या पकडल्या, अशी ३ वेळा कारवाई झाली. पण यामध्ये जाणीवपूर्वक कमर्शिअल कॉन्टिटी येऊ दिली नाही. आपणं खुप चांगले कायदे करतो मात्र त्यात पळवाटा काढणारे गुन्हेगार पोलीसाना हाताशी धरले जाते. एक पुडी १ ग्रॅमची असेल ना मग ४५ ग्रॅम कसे झाले असा सवाल आमदार पाटील यांनी उपस्थितीत केला. तुळजापूर ड्रग्ज तस्करीत आरोपी असलेले मुंबई येथील ड्रग्ज तस्कर संगीता गोळे व वैभव गोळे यांच्यावर यापुर्वी सुद्धा ड्रग्ज तस्करीचे गुन्हे दाखल आहेत. तपासात तुळजापूर, सोलापूर, मुंबई अशी साखळी समोर आली आहे. ४ महिन्यापुर्वी आरोपीच्या जबाबात व दोषारोपपत्रामध्ये मुंबई येथील अतुल अग्रवाल याचे नाव समोर आले आहे, त्यांचे नाव व मोबाईल नंबर जबाबात आहे, त्यावर एकदा आपण फोन केला तर तो मोबाईल सुरु आहे, तो खुलेआम फिरत आहे. मग त्यांच्यापर्यंत पोलीस का पोहचले नाहीत, याचे उत्तर दिले पाहिजे असा प्रश्न आमदार कैलास पाटील यांनी उपस्थित केला. तसेच परंडा येथील गुन्ह्यात ड्रग्ज म्हणुन कारवाई केली मात्र त्यांचे नमुने प्रयोगशाळा तपासणीत पाठवताना ते होमगार्डमार्फत पाठवण्यात आले, त्याचा अहवाल कॅल्शियम क्लोराईड असा आला, अहवाल कोन बदलला, ब समरी कोर्टात दिली त्यानंतर पुन्हा चौकशी करायची भुमिका घेतली. कायदा कितीही चांगला केला तरी अंमलबजावणी करणारी यंत्रणा चांगली असेल तर कायदा बनवायला अर्थ आहे.

### ड्रग्स तस्करांवर मकोका लावा

ड्रग्ज तस्करीत २ पेक्षा अधिक वेळा गुन्हेगारांचे नाव आले की त्याला मकोका लावला पाहिजे तरच याला आळा बसेल. ग्रामीण भागात दारू, हातभट्टीचे प्रमाण जास्त आहे. आरोपीला अटक केली की लगेच सोडून दिले जाते, ते लोक वारंवार गुन्हे करतात म्हणुन दारू, हातभट्टी व गुटखा तस्करीचा यात समावेश करुन त्यांच्यावरही मकोका लावावा अशी मागणी आमदार कैलास पाटील यांनी केली.






CMYK

दैनिक आरंभ मराठी



# लोकसंख्येचं ओझं सावरताना..!

## जागतिक लोकसंख्या दिन विशेष



संयुक्त राष्ट्रसंघ लोकसंख्येच्या (२०२४) अहवालानुसार २०६२ मध्ये भारताची लोकसंख्या १७० कोटींवर पोहोचेल आणि ती त्याच्या शिखरावर असेल.त्याच वेळी २०५४ पर्यंत भारतातील २० ते ६४ वर्ष वयोगटातील लोकसंख्या वाढत जाईल. म्हणजे कामाचे वय वाढत जाईल. तर २०८० पर्यंत ६५ वर्षापेक्षा जास्त वयाच्या लोकांची संख्या १८ वर्षाखालील लोकांपेक्षा जास्त असेल. २०८३पर्यंत संपूर्ण जगाची लोकसंख्या वाढत जाईल आणि ती १०२० कोटींवर पोहोचेल. त्यानंतर हे प्रमाण कमी होण्यास प्रारंभ होईल.एका अहवालानुसार देशात ४० वर्षात २८ कोटी लोकसंख्येची भर पडेल. आज जगभरातील ज्या देशाची लोकसंख्या कमी आहे त्यांना ते संकट मानतात. जगाच्या तुलनेत जे मुळातच लोकसंख्येच्या शिखरावर आहे ते आपले स्थान कायम ठेवण्यास आशा व्यक्त करतात. जणू लोकसंख्यावाढीची जागतिक स्पर्धा भरलेली आहे. मर्यादित आणि नियंत्रित लोकसंख्या असावी या मुद्द्यावर मत मांडणारी अभावाने सापडतील. भारताकडे जगाच्या २.४ टक्के भूभाग आहे.ज्यामध्ये जगातील सुमारे १८ टक्के लोक राहतात.तसेच त्यांच्या पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यासाठी केवळ चार टक्के जलस्रोत आहे. या लोकसंख्यावाढीच्या स्पर्धेत नैसर्गिक साधनसामग्रीची मागणी, पुरवठा व साखळी बिघडणार. नैसर्गिक संसाधनाचे शोषण, पर्यावरणीय समतोल ढासळणार व त्याचे दुरोगामी परिणाम म्हणून हवामान बदल, ओझेनची कमतरता, हिम पर्वतांचे स्लखन, अवर्षण, अतिवृष्टी, तापमानवाढी सारख्या असंख्य संकटांना आज जग सामोरे जात आहे. बेरोजगारी,उपासमार, अन्नधान्याची परावलंबिता,स्थलांतरण, आर्थिक, सामाजिक अस्थिरता, आरोग्य विषयक आणीबाणी, कुपोषण, युद्ध संघर्ष हे त्या देशातील कळीचे मुद्दे ठरतात. नेमके हेच मुद्दे नागरिकांच्या जीवनमानात तद्वतच देशांच्या विकासात खिळ घालीत असतात. तर वरील नमूद केलेल्या आकडेवारीप्रमाणे २०५४ पर्यंत देशातील २० ते ६५ वर्ष वयोगटातील लोकसंख्या वाढती राहील, आणि हीच संख्या देशाची क्रयशक्ती आहे. अभ्यासाकांच्या मते देशात लोकसंख्यावाढीच्या लाभांश घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण करावे लागतील. जसे की शेजारील चीनने केले आहे. जपानला मागे टाकून भारत जगातील चौथी अर्थव्यवस्था आज बनली आहे. परंतु दरडोई उत्पन्नात १४२ व्या क्रमांकावर आहे. २२१ देशात भूक निर्देशांकात भारत १०५ व्या क्रमांकावर आहे.रोजगार आणि आरोग्य सेवेसाठी माघारलेलो आहो.वाढती लोकसंख्या आणि अधिक वाहनांच्या वापरांमुळे भारत जगातील सर्वाधिक प्रदूषित देशांमध्ये तिसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. यासारख्या अगणित समस्येवर मात करण्यासाठी निसर्गपूरक,मूलभूत सुविधेवर भर देणे गरजेचे आहे. देशातील युवा श्रमशक्ती व देशांतर्गत उपलब्ध बाजारपेठ विकासदर शिखरावर नेण्यास सक्षम आहे. देशातील वाढती लोकसंख्या स्थिर ठेवण्यासाठी तसे पुरेसे पूरक प्रयत्न होणे अतिशय महत्त्वाचे ठरते. नियंत्रित लोकसंख्या त्या देशातील नागरिकांचे जीवनमान सुधारण्यास मोलाचे योगदान करीत असते.



शशिकांत मधुकर तोटे
दारव्हा,जि. यवतमाळ
मो:९१३०८३५४५८

# चॅटिंग:संवादाची नवी भाषा

'व्हाट्सअॅप' हे सोशल मीडिया प्लॅटफॉर्म तयार झाल्यानंतर लोक तोंडाने बोलण्यापेक्षा टाइप केलेल्या शब्दांनी आणि इमोजींनी अधिक संवाद साधू लागले. भावना आणि विचार व्यक्त करण्याची ही एक नवी पद्धत माहिती-तंत्रज्ञानाच्या युगात उदयास आली. संप्रेषणाच्या या नव्या माध्यमामुळे लोक दूर असूनही एकमेकांशी भावनिक संबंध निर्माण करू लागले. खरं सांगायचं तर, टाइप केलेले शब्द आणि वाक्यरचना या तोंडी बोलण्यापेक्षा अधिक प्रभावी ठरत असतात मानवाने संवाद साधण्याची सुरुवात केल्यापासून आजच्या चॅटिंगपर्यंतचा प्रवास लाखो वर्षांचा आहे. गुहांमध्ये कोरलेली चित्रलिपी आजच्या इमोजीच्या स्वरूपात पुन्हा जन्माला आली आहे, असं म्हणावंसं वाटतं.आज चॅटिंग हे काहींसाठी कामाचा भाग बनले आहे, तर काहींसाठी ते विरंगुळ्याचं साधन ठरले आहे. 'चॅटिंग'चा मराठीत अर्थ 'गप्पा मारणे' असा होतो. पूर्वी लोक पारावर, मंदिराच्या कट्ट्यावर एकत्र येऊन पान-सुपारी खात, तंबाखू मळत मळत गप्पांचे फड रंगवत. आज तेच गप्पांचे फड चहाच्या कॅन्टीनवर, रेल्वे प्रवासात, कॉलेज कट्ट्यावर किंवा ऑफिसमध्ये जमतात.अशाच गप्पांचे आधुनिक स्वरूप म्हणजे व्हॉट्सअॅप ग्रुपवरील संवाद. या गप्पांमध्ये लोक अनेकदा मतभेद करतात, पण त्याच वेळी काही वेळा त्या गप्पांतून उपयुक्त निष्कर्षही काढले जातात. एखाद्या मुद्द्यावर सर्व सहमत होतात, तर कधी मतविभाग होतो. अशा प्रत्यक्ष समोरासमोर बसून दिलेल्या विषयावर तर्कसंगत गप्पा मारण्याला कॉर्पोरेट जगतात 'ग्रुप डिस्कशन' म्हणून ओळखलं जातं. आज या कौशल्याला भरपूर महत्त्व दिलं जात आहे. ग्रुप डिस्कशन मधील कामगिरीवरून व्यक्तिमत्त्वाचे परीक्षण करून कंपन्या उमेदवारांची निवड करतात.

गप्पा मारणे हे एक कौशल्य आहे. जो व्यक्ती योग्य शब्दांचा वापर करून, युक्तिवादाने, कोणाच्याही भावना न दुखावता, प्रभावीपणे मुद्दे मांडतो, तो खरा संवादक 'गप्पाड्या' समजला जातो. हे कौशल्य वाचनाने, सरावाने आणि वैचारिक प्रगल्भता गाठल्याने प्राप्त होते. काही लोकांशी गप्पा मारायला आपल्याला विशेष आवडते, कारण त्यांचं बोलणं अर्थपूर्ण, दिलखुलास आणि विचारप्रवर्तक असतं. अशा लोकांची संगतही आपल्याला हवहवसी वाटते.मेंदूच्या उत्क्रांतीचा शेवटचा टप्पा म्हणजे भाषेचा उगम होय. माणसाला मिळालेलं ज्ञान पुढील पिढीकडे देण्याचं माध्यम म्हणजेच 'भाषा' आणि त्यातून घडणाऱ्या गप्पा. पूर्वजांच्या अनुभवातून पुढील पिढ्यांना समजलेली माहिती जसं की एखादा प्राणी हिंस्र आहे, एखादं फळ विषारी आहे, ऋतूचक्र, स्थल मार्ग, जल मार्ग ही सर्व माहिती पिढ्यान्पिढ्या संवादातून, गप्पांतून पुढे गेली. गप्पांमधून केवळ हसत-खेळत वेळ घालवला जात नव्हता, तर समाजरचना, नैतिकता, व्यवहार, संस्कार यांचाही पाया रचला जात होता. चांगल्या गोष्टींचं कौतुक करणं, चुकीवर टीका करणं, अनुभवांची देवाणघेवाण करणं हे सर्व गप्पांमधून घडत गेलं.

समाजाचा चेहरामोहराही अशा संवादांमधून घडत गेला. गप्पांची सुरुवात लाखो वर्षांपूर्वी झाली असली तरी, सुसंगत व विस्तृत संवाद शक्य होणं ही मानवी उत्क्रांतीतील एक क्रांतिकारक घटना होती. त्यामुळेच माणूस 'शिकणारा प्राणी' ठरला. चॅटिंगचा हा ऐतिहासिक,प्रवास आणि त्याचं आजचं स्वरूप आपल्याला शिकवतो की माणूस 'हाताची घडी तोंडावर बोट ठेवून' जगू शकत नाही. त्याच्या मनात येणारे विचार, भावना, कल्पना, संकल्पना यांना अभिव्यक्त करण्याची तीव्र गरज त्याला असते. आणि आज ही गरज चॅटिंगच्या विविध रूपांतून व्यक्त होत आहे.



किशोर जाधव,
सोलापूर
मो. ९९२२८८२५४१

# विद्यार्थी अपघात विमा योजना नुकसान भरपाई जलद देणार

आरंभ मराठी | मुंबई

राज्यातील पहिली ते बारावी वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राजीव गांधी विद्यार्थी अपघात योजनेंतर्गत देय असलेले सानुग्रह अनुदान विद्यार्थ्यांच्या अपघातानंतर त्यांच्या कुटुंबियांना जलद दिले जाईल, असे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी विधानभेत प्रश्नोत्तराच्या तासावेळी सांगितले. सदस्य डॉ. विश्वजित कदम यांनी राजीव गांधी विद्यार्थी अपघात योजना सानुग्रह अनुदान प्रलंबित असल्याबाबत विधानसभेत प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य नितीन राऊत यांनी सहभाग घेतला.मंत्री श्री. भुसे यांनी सांगितले, या योजनेद्वारे अपघातात विद्यार्थ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्यास एक लाख ५० हजार रुपये, दोन्ही अवयव, डोळे किंवा एक डोळा गमावल्यास एक लाख रुपये, तर कायमचे अपंगत्व आल्यास ७५ हजार रुपये नुकसानभरपाई दिली जाते. पूर्वी ही योजना विमा कंपनीच्या माध्यमातून राबवली जात होती. मात्र त्यात अनेकदा कागदपत्रांसाठी होणारी विलंब, लाभ मिळवण्यात अडथळे येत असल्याने शासनाने सानुग्रह अनुदान स्वरुपात राबविण्याचा निर्णय घेतला असल्याचे त्यांनी सांगितले. शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्याकडे अधिक लक्ष देण्यात आले असून सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मदतीने प्रत्येक विद्यार्थ्याची आरोग्य तपासणी करून त्याचे हेल्थ कार्ड तयार केले जात आहे. सांगली जिल्ह्यात या योजनेचे प्रलंबित असलेले सानुग्रह अनुदान लवकरच दिले जाईल, असेही शालेय शिक्षण मंत्री श्री. भुसे यांनी सांगितले.

# राज्यातील अल्पसंख्याक शाळांच्या मान्यतेसंदर्भात समिती गठीत करणार

## शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे

आरंभ मराठी | मुंबई



राज्यातील अल्पसंख्याक शाळांच्या मान्यतेसंदर्भात समिती गठीत करून या शाळांना देण्यात आलेल्या मान्यतेबाबत सविस्तर आढावा घेतला जाईल अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी विधानसभेत दिली.विधानसभा सदस्य गजानन लवटे, प्रशांत बंब, नाना पटोले यांनी अल्पसंख्याक शाळांच्या मान्यतेबाबत प्रश्न उपस्थित केला होता.शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे म्हणाले, राज्यातील अल्पसंख्याक शाळांच्या मान्यतेसंदर्भात काही तक्रारी आहेत. यासंदर्भात समितीकडून राज्यातील अल्पसंख्याक शिक्षण संस्थांबाबत लागू असलेल्या कायद्यांच्या चौकटीत राहून चौकशी केली जाईल. त्यानंतर यामध्ये गैरव्यवहार झाल्याचे आढळल्यास आवश्यक ती कारवाई करण्यात येईल.तसेच शालार्थ आयडी घोटाळा प्रकरणाची चौकशी करण्यासाठी सनदी अधिकारी आणि वरिष्ठ पोलिस अधिकारी यांची एसआयटी पथक तयार करून या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात येईल असेही श्री.भुसे यांनी सांगितले.

# राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय प्रतिपूर्तीची प्रक्रिया सुलभ करणार

आरंभ मराठी | मुंबई

राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत प्रति कुटुंब प्रति वर्ष पाच लक्ष रुपये रकमेचे आरोग्य संरक्षण पुरविण्यात येत आहे. ही योजना कॅशलेस आहे. यापेक्षा अधिक खर्च झाल्यास प्रशासकीय विभागामार्फत वैद्यकीय प्रतिपूर्ती करण्यात येते. ही प्रक्रिया अधिक सुलभ करण्यात येईल, असे सांस्कृतिक कार्य मंत्री अॅड. आशिष शेलार यांनी विधान परिषदेत सांगितले.

# बाजार समितीच्या हितासाठी सर्वस्व पणाला लावणारे नेतृत्व: शिवाजीअप्पा कापसे



कळंब कृषि उत्पन्न बाजार समितीची स्थापना ३०/११/१९५३ साली झाली. बाजार समिती स्थापनेवेळी वाघमोडे, सय्यद,कुलकर्णी अशा महान नागरीकांनी गावचा विकास व्हावा शेतकऱ्यांना आपला शेतमाल एकजागी विकता यावा या महान उद्देशाने आपले रोजी रोटी असणारी जमीन बाजार समितीस दान दिली होती. दान दिलेल्या जमीनीवर बाजार समितीचा कारभार सुरू करण्यात आला होता. बाजार समितीचे प्रथम सभापती म्हणून कामकाज पाहीलेले तत्कालीन विधीज्ञ व त्यांचे पासून सुरु झालेला प्रवास हा हळूहळू मंद गतीने का होईना सुरू होता. बाजार समिती स्थापन होवून ७० वर्ष होवूनही बाजार समितीत बाजार समितीच्या वतीने शेतकऱ्यांच्या हीतासाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधा जसे की,रस्ते, गोदाम,विद्युत पुरवठा,प्रशस्त कार्यालय आदी गोष्टींची वानवा होती. बाजार समितीत शेतीपूरक व्यवसायासह इतर ही व्यवसाय असल्याने तसेच अनेक गैर व्यवसाय अतिक्रमणे आदी बाबी असलेले बाजार समिती उत्पन्नाच्या बाबतची चांगली असूनही बदनामीच्या फेऱ्यात अडकल्याने हळूहळू उत्पन्नावर परणिाम होवू लागला, बाजार समितीचे उत्पन्न घटल्याने पायाभूत सुविधा उभा करणे अशक्य वाटू लागले यातूनच बाजार समिती क्रमांक एक वरून घसरत जावून तिसऱ्या क्रमांकाकडे जावू लागले. यास तत्कालीन संचालक मंडळ निर्णय घेणारे सभापती तत्कालीन अधिकारी ततिकेच जबाबदार होते. बाजार समिती एक दिवस संपूष्ठात येईल असे वाटप असताना दि-२२/५/२०२३ रोजी बाजार समितीच्या सभापती पदावर शविाजी दिगांबर कापसे नावाचा अवलिया विराजमान झाला. प्रथम दिवशी बाजार समितीच्या सर्व कर्मचाऱ्यांची बैठक लावून आतापर्यंत झालेला खर्च,खर्चात करावयाची कपात,उत्पन्न वाढीची स्त्रोत, बाजार आवारात होणाऱ्या चोऱ्या आदी बाबींबाबत कर्मचाऱ्यांकडून माहिती घेवून सभापती पदाचा प्रवास सुरू केला.बाजार समिती आवारात शेतकरी बांधवांसाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टी दुर गेल्या होत्या, अनेक शेतकरी बांधवांना बोलावून घेवून त्यांच्या अडी अडचणी, त्यावर कोणते उपाय करता येतील, यावर चर्चा करून बाजार समिती सुधारणा करीता २४ तासापैकी १२ ते १३ तास बाजार समितीच्या कार्यालयात उपस्थति राहून बाजार समितीच्या हतिासाठी कोणते निर्णय घ्यावेत, याबाबत व्यापारी असो.शेतकरी बांधव अधिकारी वर्ग यांचेशी चर्चा करून घेतलेले निर्णय पूर्णत्वास जाण्यासाठी संचालक मंडळ यांना विश्वासात घेवून बाजार समितीत अनेक महत्वाचे निर्णय घेतले.बा.स.चे उत्पन्न वाढविण्यासाठी बंद असलेले स्त्रोत चालू केले, चालू असलेले जोरात पळविले तर काही नवनि स्त्रोत सुरु करून उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न केला. तुटीमध्ये असणारी बाजार समिती खर्च कपातीमुळे नफ्यात आली. अनेकांकडे थकीत असणाऱ्या रक्कमा वसूल करून उत्पन्नात भर पाडल्याने बाजार समिती खात्यावर करोडो रुपये शिल्लक राहीले. शिल्लक रक्कमेचा बाजार समितीच्या हतिासाठी निर्णय व्हावा म्हणून ७० वर्षात न झालेले रस्ते पक्के करण्याचा निर्णय घेवून ३.५२ लक्ष रू.ची प्रशासकीय मान्यता घेवून शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा व व्यापाऱ्यांच्या हतिाचा प्रश्न मार्गी लावत आहेत. तत्कालीन पालकमंत्री डॉ. तानाजी सावंत यांच्या माध्यमातून ९७ लक्ष रू.चा रस्ता अतिशय चांगल्या दर्जाचा करून घेतला. बाजार समितीत चोरीवर नियंत्रण व्हावे म्हणून ९ लक्ष रू.चे सी.सी.टी.व्ही बसविले. बाजार आवारात शेतकऱ्यांची हेळसांड होवू नये म्हणून प्रत्येक महण्यिाला व्यापाऱ्यांच्या दुकानावर अचानकपणे भेट देवून चाललेल्या कारभाराची तपासणी केली जाते. मागील २ वर्षात जर वर्षी ३० ते ३५ लक्ष रू. शेतमाल तारण योजनेतून वाटप करून शेतकऱ्यांचे मदत करण्याचा प्रयत्न करत आहेत.खेडोपाड्यामध्ये खरेदी होवून बाजार समितीत येणाऱ्या शेतमालाची आवक कमी झाल्याने मौजे इटकुर येथे तात्पुरते उपबाजार सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू असून लवकरच त्या बाबत कार्यवाही पुर्णत्वास येईल. बाजार समितीतील कर्मचाऱ्यांशी शस्ति लावून त्यांच्या कामाचे कालावधी वाढवून आत्तापर्यंत न झालेली कामे ही पूर्ण करण्याचा त्यांचा मानस आहे. मागील २० ते २५ वर्षाचे इतीवृत्त स्कॅन करून बाजार समिती डीजीटल करण्याचा प्रयत्न चालू आहे.मागील ७० वर्ष व सभापती पदावर विराजमान झालेपासूनचा कालखंड तुलनात्मक दृष्टीने पाहीला असता मा.सभापती यांनी अतिशय महत्वाचे निर्णय घेवून बाजार समिती विकासाच्या दृष्टीने वाटचाल करत आहे. असे दिसून येत आहे. बाजार समितीत असलेले अतिक्रमण एकदा जमीनदोस्त केले होते पुढे जावून २५ ते ३० कोटी रू.चे ५ मजली शॉपिंग कॉम्प्लेक्स तसेच गोदाम, व्यापारी गाळे आदी सुरू करावयाचा मानस आहे. बाजार समितीस अशा विचार सरणीचा व काम करण्याची उर्मी असणारा सभापती मिळणे हे बाजार समितीचे भाग्य आहे. अशा सभापतीस त्यांच्या वाढदिवसानिमित्ति शेतकरी,कष्टकरी,व्यापारी,कर्मचारी यांच्या वतीने खूप खूप शुभेच्छा.

एक कर्मचारी,
बाजार समिती, कळंब

# शब्द कधी बोलूनही न कळणारे, शब्द कधी न बोलता बरंच काही सांगणारे

आरंभ मराठीच्या रसिक वाचकांना नमस्कार. आज काव्यारंभ या सदराचे तेविसावे
पुष्प!
हे पुष्प मी आज गुंफणार आहे,
प्रा. सौ. योगिता चंद्रशेखर सुरवसे म्हणजे,
पूर्वाश्रमीची योगिता गंगा गौतम यादव यांच्या कवितांनी गुंफणार आहे. त्यांचे शिक्षण
बी. एड. मराठी, इतिहास
एम. ए ,एम. एड मराठी झालेले आहे. अक्षरवेल महिला साहित्य मंडळ धाराशिव- च्या त्या सदस्य आहेत तसेच सावित्रीबाई फुले युवती महिला मंडळ, धाराशिवच्या त्या अध्यक्ष
आहेत. रामकृष्ण परमहंस कॉलेज तसेच उदगीर येथे एक दिवशीय साहित्य संमेलनामध्ये काव्य सादरीकरणकेलेले आहे.
* सावित्रीच्या लेकी या .५० कवयत्रीच्या पुस्तकांमध्ये त्यांचे काव्य लेखन आहे.
* दिवाळी अंक अंकुर मध्ये त्या कविता लेखन करतात
* काव्य लेखन व काव्य सादरीकरणासाठी त्यांना अनेक सन्मान व प्रमाणपत्र.
* मराठवाडा साहित्य परिषद काव्य महोत्सव मध्ये काव्य . सादरीकरण.
* मराठवाडा साहित्य परिषद, धाराशिवच्या त्या सदस्य आहेत. चंद्रयोग हा त्यांचा
* काव्यसंग्रह प्रसिद्ध आहे.
* आपल्या काव्यलेखनाच्या छंदात त्या खूप रमतात. शब्दांच्या जगात रंगून जातात. आपल्या शब्द या कवितेत त्या म्हणतात,* कधी शब्द बोलूनही न कळणार असतात* तर कधी काहीच न बोलता बरंच काही बोलून जातात* किती भावगर्भ शब्दरचना!
आई बद्दल लिहिताना त्यांना
आई असते क्षमेची मूर्ती
आपल्या मुलांचे अनेक अपराध पोटात घालणारी
सतत उमलत राहून सुगंध दरवळत ठेवणारी
अशा सुंदर ओळी सहज स्फुरतात. तर आपल्या प्रियकराबद्दल बोलताना त्या म्हणतात, मी त्याच्या रंगात रंगताना माझाच रंग विसरून गेले,
रंग होता माझा वेगळा,
त्याच्या रंगात रंगुन माझा रंग गेले विसरून!
तर तुझ्याशिवाय या कवितेत
माझ्याकडे तुझ्या शिवाय कोणी
नाही असे व्याकळ होऊन म्हणतात. तर कधी त्यांना आपण या जगात नसलो तर सख्याला आपली आठवण येईल का असा अजब प्रश्न सतावतो,
जेंव्हा मी नसेन या जगात,
तेंव्हा तरी मी असेन का तुझ्या मनात
असे त्या कवितेतून विचारतात,
तर अशा या भावगर्भ कविता चा आपण रसास्वादघेऊया.



डॉ. रेखा अनिल ढगे

## काव्यारंभ

## जीवन असच असतं

सुखा नंतर दुःख
दुःखानंतर सुख असतं,

कधी आपलं तर
कधी दुसऱ्याच असतं,

जीवनात कधीही हार मानून निराश
व्हायचं नसतं

हार झाली तरी जीत मानून जगायचं
असतं

जीवन हे एक सुख
दुःखाचा संगम असतं

निराशे नंतर आशेच
किरण उगवतच असतं

अपयश आलं म्हणून
माग सरकायचं नसतं

प्रयत्न वर प्रयत्न करून
यश गाठायचं असतं

स्वप्न विसरून वास्तव
हेच सत्य मानायचं असतं

हसत हसत दुःखातून
सावरायचं असतं

यालाच जीवन जगणं
म्हणायचं असतं

यालाच जीवन जगणंम्हणायचंअसतं

## शब्द

शब्द असतात बोलके
शब्द असतात मुके

शब्द हे शस्त्र हे असतात
शब्द हे अस्त्रही असतात

शब्दाने जिवंत व्यक्ती मारला जातो
शब्दामुळेच हजारो वर्ष मृत व्यक्ती
आठवणीत राहतो

कधी शब्द बोलूनही न कळणारे
असतात

तर कधी काहीच न बोलता बरच
काही बोलून जातात

शब्दामुळेच मित्र ही बनतात
शब्दामुळेच शत्रूही तयार होतात

शब्दांमध्ये असते साखरेची गोडी
तर असते कधी कडू सत्वाची दोडी

म्हणून शब्द जपून वापरावे लागतात
म्हणून शब्द जपूनवापरावेलागतात

## रंग गेले विसरून

रंग होता माझा वेगळा
त्याच्या रंगात रंगुनी
रंग झाला माझा वेगळा

त्याच्या उष्ण रंगात
सम्य होऊन मी रंगले

त्याच्या संसारात रंगीत
होऊन मी नहाले

आले जीवनात रंग
कितीतरी काळे पांढरे

तरी रंगून जाणे
मी नाही सोडले

कोमेजल्या अनेक कळ्या
फुले होण्याआधीच

पण दरवळणे मी नाही सोडले

रंगतरंग त्याच्या रंगात मी
माझाच रंग गेले विसरून
माझाचरंगगेलेविसरून

## तुझ्या शिवाय

रात्रही उलटून जाते
वाट पाहता पाहता

दिवसही निघून जातो
तुझी वाट पाहता पाहता

उत्तर ही तुझीच
प्रश्नही तुझाच

निर्णयही तुझाच
आणि हक्कही तुझाच

तुझ्यासाठी मी कोणी नाही
पण माझ्याकडे तुझ्याशिवाय कोणी
नाही
तुझ्याशिवायकोणीनाही

## जेव्हा मी नसेल?

जेव्हा मी नसेन या जगात
तेव्हाही तू असशील माझ्या अंतरात,

जेव्हा मी नसेन या जगात
तेव्हा तरी मी असेन का तुझ्या
मनात,

जेव्हा मी नसेन या जगात
तेव्हाही माझा जीव असेल गुंतलेला
तुझ्यात,

जेव्हा मी नसेन या जगात
जाईल जळून हे शरीर माझे

पण चटके असतील कायम तुझ्या
मनात

जेव्हा मी नसेने या जगात
मी सोसलेल्या यातनांच्या
झळा लागतील तुझ्या हृदयात

जेव्हा मी नसणे या जगात
जेव्हा मीनसेनेयाजगात

## पुन्हा: येशील का?

ती नव्याने भेटेल का मला
तिला मीच तोडले होते,

ती मागत होती प्रकाश मला,
तिला अंधारात मीच सोडले होते,

तिला सुगंधी होऊन
दरवळायचे होते,

भावनेखाली मी तिला
चुरगाळले होते,

वैभवाच्या मानात कळी
खुडून काढली गर्भात होती,

तू याचना वाचवण्याची केली होती,

पण मी गया नाही तुला घातली
होती,

केले नकळत जरी पाप मी,

सांग पुन्हा तू मला भेटशील का?
सांग पुन्हा तूमलाभेटशीलका?

## आई


आई असते एक फुलाची कळी
सतत उमलत राहून सुगंध दरवळत
ठेवणारी

आई असते क्षमेची मूर्ती
आपल्या मुलांचे अनेक अपराध
पोटात घालणारी

आई असते एक कोमल छाया
सतत सोबत राहून मार्ग दाखविणारी

आई असते परोपकारी
स्वतःसाठी न जगता इतरांसाठी
जगत राहणारी

आई असते त्यागाची देवता
स्वतःच्या इच्छा मनीषा बाजूला
सारून
जीवन दुसऱ्यावरवाहणारी



सौ. योगिता चंद्रशेखर सुरवसे

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८०,विभागीय कार्यालयः सेक्टर नंबर ३२४, ई वॉर्ड, रिवोल्युशन, ऑफिस नंबर युजी ०७,स्टेशन रोड, करवीर, कोल्हापूर RNI NO.- 2023/90078,

# परंडा नगरपालिकेतील भ्रष्टाचाराच्या चौकशीसाठी परंडा शहर कडकडीत बंद

आरंभ मराठी | परंडा

परंडा नगरपालिकेच्या मुख्याधिकारी मनीषा वडेपल्ली यांनी प्रशासकीय काळात केलेल्या भ्रष्ट्राचाराची तात्काळ चौकशी करून त्यांना निलंबित करावे या मागणीसाठी गुरुवारी (दि.१०) शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला. यावेळी तहसीलदारांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, पालिकेत भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे घडली आहेत त्याची चौकशी करावी. श्रीसंत एकनाथ महाराज यांच्या पालखी मार्गाचा रस्ता फोडला, शहरातील कासीमबाग येथे सार्वजनिक सौचालय



बांधुन देखील गेल्या चार वर्षापासून बंद आहे, शहरातील सिमेंट रस्ते, गटार यांच्यामध्ये ताराचे पोल आले आहेत याकडे संबंधित अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष आहे. तसेच गटारीच्या मधोमध विद्युत डीपी असताना गटारीचे काम केले. शहरातील स्वामी समर्थ नगर मधील अंतर्गत रस्ते मागील तीन महिन्यापासून खोदून ठेवलेले आहेत, स्वच्छ भारत अभियान अंतर्गत प्लास्टिकचे डबे कचरा संकलन करण्यासाठी दिले नाहीत, केवळ फोटो सेशन झाले. घनकचऱ्याची निविदा १५ लाख रुपयांच्या असताना कामाला केवळ दहा माणसे होती. शहरातील पाण्याची परिस्थिती भयानक आहे. उशाला धरण असताना देखील प्रत्येक गल्लीत स्वच्छ पाणीपुरवठा होत नाही अशा अनेक तक्रारी निवेदनात करण्यात आल्या आहेत. हे निवेदन भ्रष्टाचार कृती समितीने तहसीलदार यांच्यामार्फत मुख्यंमंत्र्यांना दिले. यावेळी कृती समितीने शहर बंद ठेवले होते. या निवेदनावर शिवसेना जिल्हा प्रमुख ठाकरे गट रणजीत पाटील, अॅड संदिप पाटील, श्रीहारी नाईकवाडी, नसिर शहाबर्फीवाले, इस्माईल कुरेशी, राष्ट्रवादी सामाजिक न्याय जिल्हाध्यक्ष राहुल बनसोडे, शिवसेना ठाकरे गट शहर प्रमुख रईस मुजावर, नुरुद्दीन चौधरी, शब्बीर खॉ पठाण, समिर पठाण, अॅड अजय खरसडे, जमिल पठाण, नंदु शिंदे, माजी नगरसेवक मन्नान बासले, सत्तार पठाण, रमेशसिह परदेशी, कुणाल जाधव , संतोष गायकवाड, अॅड अनिकेत काशीद, मोहन जगताप, तुकाराम गायकवाड, राज पाटील, नितिन शिंदे आदींच्या निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत.

# जिल्हा परिषद हायस्कूलचे पाचवीतील ६ विद्यार्थी झाले शिष्यवृत्तीधारक

आरंभ मराठी | उमरगा

उमरगा येथील आय.एस.ओ. मानांकित जिल्हा परिषद हायस्कूल मधील पाचवीचे १४ पैकी १२ विद्यार्थी शिष्यवृत्ती पात्र झाले होते, त्यातील ६ विद्यार्थी शिष्यवृत्ती धारक झाले आहेत. शिष्यवृत्तीधारक झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचा केंद्रप्रमुख शिला मुदगडे, मुख्याध्यापक पद्माकर मोरे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी प्रशालेतून सर्वप्रथम साकीब हन्नुरे २२८ गुण, आयशा कबीर २२४ गुण, श्रावणी कल्लीमुळे २२२ गुण, सिमरन जमादार २२२ गुण, ज्योती राऊत २१६ गुण, जैद मुल्ला २१० गुण घेऊन शिष्यवृत्ती धारक झाले आहेत. गेल्या चार वर्षांत प्रशालेचे १० विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांना प्रशालेतील शिक्षक संजय रुपाजी, शिल्पा चंदनशिवे सोनाली मुसळे, वर्षा राणी पाटील यांनी मार्गदर्शन केले होते. यशस्वी विद्यार्थ्यांचे उमरगा लोहारा तालुक्याचे आमदार प्रवीण स्वामी, युवा नेते किरण गायकवाड, आकांक्षा चौगुले, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे, सुजाता मोरे, अमर वरवटे, अशोक पतगे, शिक्षणतज्ञ सदानंद शिवदे पाटील, मुख्याध्यापक पद्माकर मोरे, गटशिक्षणाधिकारी अमोल राजपूत, काकासाहेब साळुंके, केंद्रप्रमुख शिला मुदगडे यांनी अभिनंदन केले. २०२५ मध्ये झालेल्या दहावी परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला आणि त्यानंतर पाचवी स्कॉलरशिप मध्ये मोठे यश मिळाल्याने जिल्हा परिषद हायस्कूल उमरगा शाळेने सर्व क्षेत्रात आपली गुणवत्ता सिद्ध केलेली आहे, असे मत मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांनी यावेळी मांडले.

# सुनील ढगे पाटील आंतरराष्ट्रीय पँथररत्न पुरस्काराने सन्मानित

## केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते पुण्यात सन्मान

आरंभ मराठी | पुणे

धाराशिव येथील आंतरराष्ट्रीय रोल बॉल कोच सुनील ढगे यांना दलीत पँथरच्या ५३ व्या वर्धापन दिनानिमित्त पुण्यातील ऐतिहासिक बालगंधर्व रंगमंदिरात केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.त्यांच्या क्रीडा क्षेत्रातील मोलाच्या योगदानाबद्दल गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन दलीत पँथरचे राष्ट्रीय अध्यक्ष यशवंत नडगम यांनी केले होते.पँथर संघटनेच्या वर्धापन दिनानिमित्ताने संघटनेने कला, क्रीडा,व्यावसायिक, सामाजिक क्षेत्रात भरावी कामगिरी करणाऱ्या विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान करण्यात आला होता. त्यानिमित्ताने धाराशिव जिल्ह्याचे सुपुत्र सुनील ढगे यांना सन्मानित करण्यात आले, ढगे पाटील यांनी केनिया, स्वीडन, डेन्मार्क, भारत




येथे झालेल्या जागतिक वर्ल्ड कप स्पर्धेमध्ये भारताचे तीन वेळा जगविजेता संघाचे मार्गदर्शक म्हणून काम पाहिले. रोल बॉलमध्ये पाकिस्तान,श्रीलंका,बांगलादेश, भूतान, नेपाळ या राष्ट्राचे ब्रँड अँबेसिडर तेथे जाऊन खेळाचा प्रचार करून रोल बॉल खेळायला आंतरराष्ट्रीय महत्त्व प्राप्त केल्याबद्दल त्यांनी दिलेल्या योगदानाची दाखल घेत आंतरराष्ट्रीय पँथर रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांच्या या सन्मानाबद्दल अभिनंदन होत आहे.

# एक पेड माँ के नाम उपक्रमाला उमरगा जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये मोठा प्रतिसाद

आरंभ मराठी | उमरगा

एक पेड माँ के नाम या उपक्रमाला उमरगा जिल्हा परिषद हायस्कूलमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन हा उपक्रम यशस्वी केला. आय.एस.ओ. मानांकित जिल्हा परिषद हायस्कूल उमरगा येथे इको क्लबच्या माध्यमातून निसर्गाला अनुकूल व पर्यावरण विषयक संवर्धन संवेदनशीलतेचा दृष्टिकोन शालेय शिक्षणातून विद्यार्थ्यांमध्ये व पालकांमध्ये विकसित करण्यासाठी इको क्लब फॉर्मेशन लाईव्ह मंच शाळेमध्ये तयार करण्यात आला आहे. मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली एक पेड माँ के नाम उपक्रमा अंतर्गत शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याकडून त्यांची आई, बहीण, आजी, मावशी, शाळेतील शिक्षिका अशा कोणत्याही स्त्री वर्गाकडून शालेय परिसरात, घराच्या जवळ, शेतामध्ये, जिथे जागा उपलब्ध असेल त्या ठिकाणी वृक्षाची लागवड करून याबाबतचा फोटो पोर्टलवर अपलोड



करावयाचा आहे. उपक्रमात तात्काळ विद्यार्थ्यांना वृक्षारोपण केल्याचे प्रमाणपत्र उपलब्ध होत आहे. त्यामुळे विद्यार्थी अतिशय आनंदाने व आवडीने आपल्या आईला घरातून सोबत घेऊन शाळेत येत आहेत व वृक्षारोपण करण्यास सांगत आहेत. प्रशालेचे मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरणावर खूप मोठे काम शाळेत अगोदरच मीयावकीच्या माध्यमातून झालेले आहे. त्यात एक पेड माँ के नाम उपक्रमातही पालकांच्या सहकार्याने वृक्षारोपण करण्यासाठी मोठा प्रतिसाद मिळत आहे. या वृक्षारोपणाचे चळवळीत रूपांतर झालेले आहे. प्रशालेतील शिक्षक बशीर शेख, विद्यानंद सुत्रावे, धनराज तेलंग, संजय रुपाजी, सदानंद कुंभार, सरिता उपासे, सोनाली मुसळे, ममता गायकवाड, शिल्पा चंदनशिवे, वर्षा राणी पाटील, सुनिता राठोड, वनमाला वाले, धोंडीराम एरंडे, महानंदा कारागीर, सुवर्णा इंगळे वैशाली चिट्टे, सुरेखा मुलगे यांच्या प्रयत्नातून वृक्षारोपणाची मोठी चळवळ शाळेत निर्माण झाली आहे.

# माडज येथे विद्यार्थ्यांकडून गुरूजनांचा सन्मान




आरंभ मराठी | माडज

उमरगा तालुक्यातील माडज येथील ग्रामीण प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी शाळेतील सर्व शिक्षकांचा गुरूपौर्णिमेनिमित्त पुष्पगुच्छ व लेखनी देऊन सन्मान केला. यावेळी क्रांती संतोष गायकवाड व धनश्री लोहार या विद्यार्थीनींनी आपले मनोगत व्यक्त केले. मनोगतात शिक्षकांप्रति कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक बाळासाहेब पेठसांगवीकर, क्रीडा शिक्षक रामजी सोळुंके, शिक्षक विक्रम चव्हाण, श्रीमती अनिता कांबळे, डॉ. बालाजी मदन इंगळे, यशवंत सुर्यवंशी, व्यंकटेश चव्हाण, पांडुरंग मुंडकर, उदय राठोड, श्रीमती नंदना जमादार, श्रीमती उषा परांडे यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व सर्व विद्यार्थी उपस्थित होते. उपस्थित राहून गुरुपौर्णिमा निमित्त शिक्षकांना पुष्पगुच्छ देऊन आशीर्वाद घेतला. यातील इयत्ता आठवी, नववी व दहावीतील सर्व विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेतला.

# प्रिती राहुल हौसलमल यांची प्राध्यापक म्हणून नियुक्ती



आरंभ मराठी | कळंब

येथील प्रिती राहुल हौसलमल यांची वसंतराव काळे महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा सत्कार समारंभ येथे संपन्न झाला, याप्रसंगी सतपाल बनसोडे, बंडूभाऊ बनसोडे, डी. जी. हौसलमल,राहुल हौसलमल,राजाभाऊ वाघमारे ,राजे सावंत आदी मान्यवर उपस्थित होते. प्रिती हौसलमल एम कॉम व एमबीए पूर्ण असल्यामुळे यांची ही निवड गुणवत्तेच्या जोरावर झाली असून, त्यांच्या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या वेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# गुरुजनांचा विद्यार्थ्यांकडून सन्मान व कृतज्ञता, दारफळ शाळेत गुरुपौर्णिमा साजरी




आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव तालुक्यातील दारफळ जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत गुरुपौर्णिमेचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. या दिवशी महर्षी वाल्मिकी ऋषी यांच्या प्रतिमेचे पूजन शाळेचे मुख्याध्यापक बिभीषण पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थ्यांनी आपले गुरु म्हणजेच मार्गदर्शक व प्रेरणास्थान असल्याचे नमूद करून सर्व शिक्षकांचा आदरपूर्वक सत्कार केला. विद्यार्थ्यांच्या वतीने प्रमुख शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. यावेळी बिभीषण पाटील (मुख्याध्यापक), विजयकुमार पाटील, शिवाजी मरपळे, बाबू सावंत, प्रदीप बोरके, श्रीमती शशिकला कापसे, श्रीमती भाग्यश्री हूगे, श्रीमती रंजना करडे, आणि सौ. स्वाती प्रदीप बोरके या सर्व शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुजनांविषयी कृतज्ञता व्यक्त करत फुलांचा वर्षाव, मनोगते व प्रेरणादायी कविता व भाषणांद्वारे सन्मान व्यक्त केला. कार्यक्रमात गुरु–शिष्य परंपरेचा गौरव करत गायन व सांस्कृतिक सादरीकरण करण्यात आले. शेवटी सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता झाली.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.

# शिक्षकांचे जिल्हास्तरीय प्रलंबित प्रश्न तत्काळ सोडवा

## प्राथमिक शिक्षक संघाची शिक्षणाधिकारी नागेश मापारी यांच्याकडे मागणी

आरंभ मराठी | धाराशिव

जिल्हा परिषदेच्या शाळेतील शिक्षकांचे काही महत्वाचे प्रश्न अनेक दिवसांपासून प्रलंबित आहेत, ते प्रश्न लवकर सोडवावेत अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या शिष्टमंडळाने लेखी निवेदनाद्वारे शिक्षणाधिकारी (प्रा) नागेश मापारी यांना प्रत्यक्ष भेटून केली. प्राथमिक शिक्षक महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष बाळकृष्ण तांबारे यांच्या नेतृत्वाखाली शिक्षणाधिकारी नागेश मापारी यांना भेटलेल्या शिष्टमंडळाने जुन्या पेन्शन योजनेसाठी पात्र असलेल्या उर्वरित प्राथमिक शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याची कार्यवाही करावी अशी मागणी केली. जिल्ह्यात सध्या शिक्षण विस्ताराधिकारी, केंद्रप्रमुख व मुख्याध्यापक यांची जवळपास ८० पदे रिक्त आहेत ही रिक्त पदे पदोन्नतीने भरावीत, वरिष्ठ वेतन श्रेणी फरक, वैद्यकीय देयके यासाठी



आर्थिक तरतूद करून प्रलंबित देयके पारित करावीत त्याबरोबरच समान सेवा असलेल्या प्राथमिक पदवीधर शिक्षक व प्राथमिक शिक्षक यांच्या वेतनातील तफावत दूर करून प्राथमिक शिक्षकाप्रमाणे पदवीधर शिक्षकाला वेतन देण्यात यावे या सर्व प्रलंबित प्रश्नावर चर्चा करून प्रश्न सोडवण्याबाबत शिक्षणाधिकारी यांना निवेदन सादर केले. यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी सुरेश वाघमारे उपस्थित होते. याप्रसंगी शिक्षणाधिकारी मापारी यांनी निवेदनातील सर्व प्रलंबित प्रश्नावर चर्चा करून पदोन्नतीचे आदेश शिक्षक बदली प्रक्रिया पूर्ण झाल्याबरोबर लगेच काढले जातील असे सांगितले. तसेच प्रलंबित पुरवणी देयकासाठी आर्थिक तरतूदीची मागणी करून तरतुद प्राप्त होताच प्रलंबित देयके पारित करण्यात येतील तसेच शिक्षकांपेक्षा पदवीधर शिक्षकाला वेतन कमी मिळत असेल तर पदवीधर शिक्षकांवरील अन्याय दूर करून पुढील टप्प्यावर वेतन निश्चिती केली जाईल याबाबत लवकरच आदेश काढण्यात येतील असे अभिवचन दिले. यावेळी राष्ट्रीय उपाध्यक्ष बाळकृष्ण तांबारे यांच्या समवेत जिल्हाध्यक्ष संतोष देशपांडे, जिल्हा पतसंस्थेचे चेअरमन शेषराव राठोड, शिक्षक नेते धनाजी मुळे, दत्तात्रय पवार, जिल्हा प्रवक्ते उमेश भोसले, प्रसिद्धी प्रमुख प्रदीप म्हेत्रे, धाराशिव तालुका अध्यक्ष राहुल भंडारे, पतसंस्थेचे संचालक अमरसिंह गोरे, कळंब तालुका कार्याध्यक्ष महादेव मेनकुदळे, बालाजी दंडनाईक, नागेश कदम, श्रीकांत गरड, अरुण खराडे इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

# परंडा येथे जिल्ह्यातील पहिले मॅटवरील कुस्ती प्रशिक्षण केंद्र सुरू



आरंभ मराठी | परंडा

परंडा येथे धाराशिव जिल्ह्यातील मॅटवरील कुस्तीचे पहिले प्रशिक्षण केंद्र गुरुपौर्णिमेच्या दिवशी (दि.१०) सुरू करण्यात आले. मराठवाड्यात अनेक तालीम संघ आहेत. परंतु, सोनारी येथील जिल्हा परिषदेचे माजी सभापती, भैरवनाथ तालीम संघ व पै नवनाथआप्पा जगताप स्पोर्टस् फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष पै. नवनाथआप्पा जगताप यांनी राजर्षी छत्रपती शाहूराजे यांचा वारसा सांभाळत तालीम संघाची स्थापना करून महाराष्ट्राभर गाजत असलेले मल्ल तयार करण्याचे काम अनेक वर्षापासून करत आले आहेत. आधूनिक काळात मॅटवरील कुस्तीचे आखाडे भरतात. भारत देश आणि जगभरात मातीवरील कुस्ती बरोबरच मॅटवरील कुस्तीचे वाढत चालले महत्व आणि आकर्षण पाहून मातीवरील कुस्ती बरोबरच मॅटवरील कुस्तीचे प्रशिक्षण केंद्र परंडा येथे उभा केल्याने कुस्ती क्षेत्रातील तमाम कुस्तीगिरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. दिनांक १० जुलै रोजी मॅट हॉलची पाहणी करून सर्व कुस्तीप्रेमी यांनी आदरभावनेने पै . नवनाथ आप्पा जगताप यांचे फेटा ,शाल , भव्य गुलाब हार घालून गुरुपोर्णिमेचे औचित्य साधून आदरपूर्वक सन्मान केला. यावेळी जुन्या काळातील पैलवान तुकाराम गंगावणे, छत्रपती शासन ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष प्राणजित गवंडी, रमेश जगताप, विजय चव्हाण, सुप्रसिद्ध पैहलवान सतिष मिस्किन, रामा गोडगे, हरि घोगरे, प्रशांत शिंदे, कैलास झिरपे, विठ्ठल ढगे, समिर पठाण, शंकर खैरे, प्रदीप ढगे, बिरुदेव राऊत, मनोज बकाल व प्रशिक्षणार्थी कुस्तीपट्टू यांनीही हजर राहून अभिष्टचिंतन केले. भव्य दिव्य हॉल निर्माण करून नवनाथ आप्पा आणि धाराशिव तसेच महाराष्ट्रातील कुस्तीगीरांची उत्कृष्ठ सोय केल्याने या पंचक्रोशीत त्यांचे कौतुक होत आहे.

CMYK

04

दैनिक आरंभ मराठी

www.arambhmarathi.com

आपलं धाराशिव

शुक्रवार, दि. 11 जुलै 2025

# कळंब तालुक्यातील ९२ गावांची सरपंच पदाच्या आरक्षणाची सोडत जाहीर

## तालुक्यातील ९२ ग्रामपंचायतीपैकी ४८ ग्रामपंचायतीवर असणार महिलाराज

आरंभ मराठी | कळंब

कळंब तालुक्यातील ग्राम पंचायतींच्या सरपंच पदासाठी आरक्षण सोडत गुरुवारी (दि.१०) जाहीर करण्यात आली. यामध्ये महिलांसाठी मोठा वाटा राखून ठेवण्यात आला असून, एकूण ९२ ग्रामपंचायतींपैकी तब्बल ४८ ग्रामपंचायतींमध्ये महिलांना सरपंच पदाची संधी मिळणार आहे. महिलांच्या राजकीय सक्षमीकरणाच्या दृष्टीने ही सोडत ऐतिहासिक ठरणार असून, विविध सामाजिक घटकातील महिलांना नेतृत्वाची संधी मिळणार आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय तसेच सर्वसाधारण प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षित पदांमध्ये समतोल राखण्यात आला आहे.कळंब तालुक्यातील ९२ ग्रामपंचायतिच्या सरपंच पदाच्या आरक्षणाची सोडत पंचायत समितीच्या सभागृहात गुरुवार (ता.१०) रोजी उपविभागीय अधिकारी संजय पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर करण्यात आली. यात अनुसूचित जाती महिला साठी ११, ओबीसी महिलासाठी १२ आणि सर्वसाधारण महिलासाठी २४ सरपंच पदाचे आरक्षण जाहीर करण्यात आले. दुपारी १२ वाजेपर्यंत ही आरक्षणाची सोडत पार पडली. यावेळी तहसीलदार हेमंत ढोकले, नायबतहसीलदार एस.डी. सांगळे, शंकर पाचभाई, जी.पी.गपाट, खलील शेख उपस्थित होते.ग्रामपंचायतिच्या आरक्षण सोडत मध्ये फेरबदल झाल्याने अनेकांचा हिरमोड झाला असून, तालुक्यातील अनेक दिग्गज नेत्यांना त्याचा फटका बसला आहे. अनेकांनी सरपंच पदाची तयारी केली होती, गावचा पुढारी होण्याचं अनेकांच स्वप्न धुळीस मिळाले आहे. तर अनेकांना लॉटरी लागली आहे. त्यामुळे सरपंच आरक्षण सोडत पार पडल्यानंतर 'कही खुशी कही गम' असे कळंब तालुक्यातील चित्र होते. दरम्यान आरक्षण सोडतीच्या दरम्यान ग्राम पंचायत सदस्य तसेच पुढाऱ्यांनी तालुकास्तरावर सोडतीच्या ठिकाणी गर्दी केली होती. यात ५० टक्के महिलांना आरक्षण असल्याने प्रत्येक प्रवर्गामध्ये महिला आरक्षण सोडत निघाल्यानंतर अनेकांना महिला आरक्षणामुळे सरपंच पदापासून मुकावे लागले. सोडत जाहीर झाल्यानंतर इच्छुकांनी निम्मी निवडणूक जिंकल्याचाच अविर्भावात आरक्षण सोडतच्या ठिकाणी जल्लोष साजरा केला. सोडतीकडे सरपंच होऊ पाहणाऱ्या पुढाऱ्यांचे आणि राजकीय नेत्यांचे लक्ष लागून राहिले होते. अखेर अनेकांचे स्वप्न पूर्ण झाले तर अनेकांचा हिरमोड झाला.




### अनुसूचित जमाती महिला : नागुलगांव.

### नागरिकांचा मागास प्रवग

वाठवडा, येरमाळा, शेलगांव दि, भोसा, आडसुळवाडी, दुधाळवाडी, हासेगांव शि, देवधानोरा, सौंदना ढोकी / एरंडगाव, हासेगांव केज, सौंदना अंबा, माळकरंजा, शेळका धानोरा.

### सर्वसाधारण

ईटकुर, ढोराळा, ताडगांव, पिंपळगाव डोळा, आढाळा, सात्रा, भोगजी, रायगव्हाण, बारातेवाडी, बहुला, आथर्डी, बरमाचीवाडी, वाकडी ई, बोरगांव ध, बोर्डा, हिंगणगांव, करंजकल्ला, लोहटा पश्चिम, मोहा, नागझरवाडी, शिराढोण, वाघोली.

## तालुक्यातील ग्रामपंचायती व आरक्षणनिहाय खालील प्रमाणे

### अनुसूचित जाती

डिकसळ, वडगाव (शि), बाभळगावं, भाटशिरपुरा, सापनाई, मंगरूळ, सातेफळ, गौर, वाकडी (केज).

### अनुसूचित जाती महिला

शिंगोली, पाथर्डी, देवळाली, कन्हेरवाडी, जवळा (खुर्द), आवाड शिरपुरा, कोथळा, जायफळ, पिंपरी (शि), घारगाव.

### नागरिकांचा मागासवर्ग महिल

बोरगाव खुर्द, दहिफळ, पानगाव, नायगावं, बोरगाव बुद्रुक, हळदगाव, मलकापुर/ संजितपुर, निपाणी, वडगाव जा, शेलगांव ज, भाटसांगवी, आंदोरा.

### सर्वसाधारण महिला

रांजणी, पाडोळी, चोराखळी, उपळाई, हावरगांव, दाभा, गंभिरवाडी, बांगरवाडी, कोठाळवाडी, बोरवंटी, लासरा, वाणेवाडी, उमरा/ परतापुर, गोविंदपुर, गौरगांव, खेर्डा, खामसवाडी, लोहटा पुर्व, मस्सा खं, तांदुळवाडी, पिंपळगांव को, रत्नापुर, एकुरका

## दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी घेतले हभप रामचंद्र बोधले महाराजांच्या समाधीचे दर्शन




आरंभ मराठी | धाराशिव

गुरुपौर्णिमेच्या पावन दिवशी भाजपा जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी डिकसळ येथे हभप रामचंद्र बोधले महाराज संस्थान येथे जाऊन रामचंद्र महाराज बोधले यांच्या समाधीचे दर्शन घेतले. याप्रसंगी अखिल भारतीय वारकरी संप्रदायाचे अध्यक्ष ह.भ.प. प्रकाश महाराज बोधले यांचेही त्यांनी शुभदर्शन घेतले. यावेळी त्यांनी भाविकांसह महाप्रसादाचा आस्वाद घेतला.

## महाराजस्व समाधान शिबीरास प्रतिसाद; शेकडो लाभार्थ्यांनी घेतला शिबिराचा लाभ

आरंभ मराठी | शिराढोण

कळंब तालूक्यातील शिराढोण येथे गुरूवारी (दि.१०) तहसिलदार हेमंत ढोकले यांच्या आदेशानुसार येथील जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळेत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर आयोजीत करण्यात आले होते. या शिबीरात शिराढोण मंडळा अंतर्गत असलेल्या सर्व गावातील नागरिकांनी लाभ घेतला. यामध्ये शेतकरी, विद्यार्थी, महिला यांनी रहिवाशी, उत्पन्न, जातप्रमाणपत्र, रेशन कार्ड, सामाजिक लाभाच्या योजना, संजय गांधी निराधार योजना, पीएम किसान आदी महसूल विभागाशी संबंधीत विविध प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. तसेच विविध प्रमाणपत्रांच्या तक्रारीचे निवारणही करण्यात आले. नागरिकांची हेळसांड न होता त्यांच्या समस्यांचे निराकरण तसेच त्यांना शासकीय योजनांचा लाभ विनाअडथळा मिळावा यासाठी तालूकाभर मंडळनिहाय या शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. शिराढोण येथील या महाराजस्व समाधान शिबीरासाठी मंडळ अधिकारी नरेशकुमार सुतार, ग्राम महसूल अधिकारी राजाभाउ गवळी, शिवकूमार केंद्रे, गणेश उपरवाड, विनोद चुकेवाड, जे.पी.कुलकर्णी, आपले सरकार सेवा केंद्र चालक अमोलसिंह चंदेल, महेश काळे, विश्वजित टेळे तसेच तहसील कार्यालयातील सर्व विभागाच्या कर्मचाऱ्यांनी परीश्रम घेतले. या शिबीरास माजी जि.प.सदस्य शहाजीराव पाटील, माजी पंचायत समिती सदस्य राजेश्वर पाटील, उपसरपंच अमोल माकोडे, दादा खतिब, गणेश महाजन, रणजित गवळी, बेबीनंदा गोरे, राजू डांगे, अवधुत पाटील आदी नागरिकांनी भेट दिली.

# दुकानदाराने वस्तूंचे संभाव्य दुष्परिणाम ग्राहकाला स्पष्टपणे सांगावेत

## ग्राहक संरक्षण परिषदेच्या बैठकीत जिल्हाधिकारी पुजार यांच्या सूचना

आरंभ मराठी | धाराशिव

ग्राहकांमध्ये त्यांच्या हक्कांची जाणीव निर्माण होणे ही काळाची गरज आहे. ग्राहक हा फक्त खरेदीदार नसून तो देशाचा जबाबदार नागरिकही आहे. त्याला योग्य ती सेवा, शुद्ध माल, योग्य दर व मोजमाप मिळाले पाहिजे. आरोग्यास हानीकारक वस्तू विकत असताना दुकानदाराने त्या वस्तूंचे संभाव्य दुष्परिणाम ग्राहकाला स्पष्टपणे सांगावेत, अशी सूचना जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी दिली. गुरुवारी (दि.१०) जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक पुजार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली यावेळी ते बोलत होते.यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी स्वाती शेंडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरिदास, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्याम गोडभरले, अन्न प्रशासन विभागाचे सहायक आयुक्त प्रदीप कुटे तहसीलदार अभिजित जगताप आदी उपस्थित होते. पुजार पुढे म्हणाले की, ग्राहकांना त्यांच्या हक्काची आणि दर्जेदार सेवा मिळावी,तसेच कोणत्याही प्रकारे फसवणूक होऊ नये,यासाठी प्रत्येक विक्रेत्याने आपली जबाबदारी ओळखून प्रामाणिक सेवा द्यावी. बैठकीदरम्यान जिल्हाधिकारी यांनी पेट्रोल पंपांबाबत विशेष नाराजी व्यक्त केली. काही पेट्रोल पंपांवर स्वच्छतेचा अभाव आहे, तसेच ग्राहकांसाठी आवश्यक सुविधा, स्वच्छतागृह,पिण्याचे पाणी यांचा अभाव जाणवतो अशा पंपांना नोटिसा बजावण्यात येतील आणि सुधारणा न झाल्यास दंडात्मक कारवाई केली जाईल,असेही त्यांनी सांगितले. ग्राहक संरक्षण संदर्भातील तक्रारी तत्काळ निवारण होणे आवश्यक आहे, यावर सर्वांची सहमती दर्शवण्यात आली.अन्न धान्य वितरण,किरकोळ व्यापार,इंधन वितरण, औषधे व वैद्यकीय सेवा या सर्व क्षेत्रात ग्राहकांच्या तक्रारींचे गांभीर्याने निवारण व्हावे,असे निर्देश दिले. जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या माध्यमातून दरमहा नियमित बैठक घेऊन ग्राहकांच्या समस्यांचा आढावा घेण्यात यावा,अशी सूचनाही जिल्हाधिकारी यांनी यावेळी दिली.



# नरसिंह मंदिरात परिसरातील गाव कचरा अन्यत्र हलवा

## पुजाऱ्यांची जिल्हा परिषद प्रशासनाकडे मागणी

आरंभ मराठी | तेर

येथील प्रसिद्ध लक्ष्मी नरसिंह देवस्थान परिसरामध्ये टाकण्यात आलेला कचरा पावित्र्य व आरोग्याच्या दृष्टिकोनातून इतरत्र हलविण्यात यावा, अशी मागणी देवस्थानचे पुजारी यांच्यावतीने जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.तेर येथील लक्ष्मी नरसिंह मंदिर हे अनादि कालापासून मंगलमय व पवित्र देवस्थान असून पुजारी म्हणून आम्ही पिढीजात परंपरागतरीत्या देवस्थानची देखभाल करीत आहोत.परंतु चालू वर्षी अचानकपणे अनाधिकृतपणे कोणतीही परवानगी न घेता काही दिवसापासून गावातील घाण, कचरा, प्लास्टिक पिशव्या इत्यादी मंदिर परिसरात खड्डा खोदून साठवणूक डेपो मारून घाण केली जात आहे. आरोग्य व मंदिर परिसराचे पावित्र्याचा दृष्टिकोनातून सहानुभूती विचार करून कचरा इतरत्र हलविण्यात यावा, अशी मागणी लक्ष्मी नरसिंह मंदिराचे पुजारी बाळकृष्ण दत्तात्रय बडवे, अजित भुजंगराव बडवे ,संतोष विनायकराव बडवे यांनी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केली आहे.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन देताना बाळकृष्ण बडवे, ग्रामस्थ प्रशांत वाघ.



# भूम तालुक्यातील ७४ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाची आरक्षण सोडत

## ईट, आंबी मध्ये सर्वसाधारण महिला तर वालवड, पाथरुड, माणकेश्वर येथे सर्वसाधारण पुरुष होणार सरपंच

### गावगाड्यातील राजकारणात निवडणुकीच्या हालचाली सुरू

आरंभ मराठी | भूम

**भूम तालुक्यातील ७४ ग्रामपंचायतीच्या २०२५ ते २०३० या कालावधीमध्ये होणाऱ्या निवडणुकीची आरक्षण सोडत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृह भूम येथे गुरुवारी (दि.१०) संपन्न झाली. तालुक्यातील प्रमुख बाजारपेठेच्या गावामध्ये सर्वसाधारण स्त्री-पुरुषासाठी आरक्षण जाहीर झाल्याने तालुक्यातील सक्षम असलेल्या ग्रामपंचायतीमध्ये अटीतटीच्या निवडणुका होणार असल्याचे दिसून येत आहे.**

ग्रामपंचायत निवडणूक म्हटले की, गाव वाडी वस्तीवरील नेतेमंडळी व नवखे राजकारणी हे निवडणूक लढवण्यासाठी उत्सुक असतात. यामध्येच शासन निर्णयामध्ये तालुक्यातील ग्रामपंचायतीच्या निवडणुका प्रथमच जनतेतून सरपंच पदाचे उमेदवार निवडण्याची संधी मतदारांना मिळणार आहे. गेल्या अनेक महिन्यापासून इच्छुक कार्यकर्ते नागरिकांशी वेगवेगळ्या माध्यमातून जवळीक साधण्याचा प्रयत्न करत आहेत. भूम तालुक्यातील राजकीय व आर्थिक दृष्ट्या सक्षम असलेल्या ईट, आंबी, पाथरूड, वालवड, माणकेश्वर या ठिकाणी सर्वसाधारण महिला व पुरुष सरपंच पदाचे दावेदार असणार आहेत. आर्थिक दृष्ट्या सक्षम असलेल्या ईट, वालवड, माणकेश्वर, पाथरूड या ग्रामपंचायतचे सर्व साधारण पुरुष हक्कदार असून ईट ग्रामपंचायत मध्ये सर्व साधारण महिलेला सरपंच पदाचा मान मिळणार आहे. अ. जा. ज. मध्ये ७४ ग्राम पंचायत पैकी वाकवड येथील ग्रामपंचायत मध्ये महिलांसाठी राखीव झालेली आहे. ७४ ग्रामपंचायती पैकी ३७ ग्राम पंचायतींमध्ये महिलांना सरपंच पदाची संधी मिळणार आहे .



### गाव निहाय आरक्षण

### अनुसूचित जाती पुरुष

उमाची वाडी, बावी, बेलगाव, कानडी,

### अनुसूचित जमाती - महिला -वाकवड

हिवर्डा, जयवंनगरनगर, तांबेवाडी, दांडेगाव ,मात्रेवाडी

### ना.मा.प्र. पुरुष

आरसोली, ईडा, गोळेगाव, डोकेवाडी, पखरूड ,माळेवाडी, सोनेवाडी,नळी वडगाव, गोगलगाव, वांगी.

याप्रमाणे गाव निहाय आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. उपविभागीय अधिकारी पाटील यांच्या उपस्थितीत तहसीलदार यांनी आरक्षण जाहीर केले.

### ना. मा. प्र. महिला

सावरगाव दे,आनंदवाडी, गोरमाळा, हिवरा, गिरवली, बेदरवाडी, जांब, सावरगाव पा, ईराचीवाडी, निपाणी.

### सर्वसाधारण पुरुष

अंतरगाव अंतरवली, आदरूड,चिंचोली ,चुंबळी, ज्योतिबाची वाडी ,दिंडोरी, देवांगरा नागेवाडी, नान्नजवाडी, पाथरूड, मानकेश्वर ,लाजेश्वर, वांगी, वालवड साडेसांगवी, सोनगिरी, हाडोंगरी, आष्टा, रामेश्वर, ऊळूप.

सर्वसाधारण महिला रामकुंड, दुधोडी, बागलवाडी,वरुड,चिंचपूर,ढगे, गणेगाव,चांदवड,देवळाली,वाल्हा, वारे वडगाव,राळेसांगवी, पाटसांगवी, बऱ्हाणपूर,आंबी,घाटनांदुर, वंजारवाडी, सुकटा,वडाचीवाडी ,अजनसोंडा, शेकापूर

### मोठ्या ग्रामपंचायतीमध्ये चुरस वाढणार

भूम तालुक्यातील आर्थिकदृष्टया सक्षम असलेल्या ईट ग्रामपंचायतचे आरक्षण सर्वसाधारण महिलेसाठी राखीव असल्याने या ग्रामपंचायतकडे तालुक्याचे लक्ष लागून राहिले आहे. गावातील लोकप्रतिनिधी पंचायत समिती, जिल्हा परिषद गाव ते जिल्ह्य पर्यंत विविध पदे भूषवलेली नेते मंडळी असल्याने निवडणुकीचे मनसुबे बांधण्यास जोरदार तयारी झाली आहे. ईट येथील ग्रामपंचायत च्या निवडणुकीमध्ये जि.प.चे माजी सभापती अण्णासाहेब देशमुख, माजी सभापती प्रताप भैया देशमुख, पं.स. माजी उपसभापती काकासाहेब चव्हाण यांची प्रतिष्ठा पणाला लागणार आहे. वालवड ग्रामपंचायत मध्ये सर्वसाधारण पुरुषाला सरपंच पदाचा आरक्षण असल्याने जनावराच्या बाजाराचे मोठे ठिकाण आहे. माजी सभापती दत्ता मोहिते व प्रवीण खटाळ यांच्या कार्यकर्त्यात निवडणूक रंगतदार राहणार आहे. त्याचबरोबर पाथरूड मध्ये सर्वसाधारण पुरुष आरक्षण असल्याने स्थानिक नेते तानाजी बोराडे, रामकिसन गव्हाणे, चेतन बोराडे यांची राजकीय हालचाल ग्रामपंचायत च्या माध्यमातून चालणार आहे. भूम तालुक्यातील सर्वसाधारण आरक्षणाच्या ठिकाणी सरपंच पदाचे उमेदवार निवडताना नेते मंडळीची दमछक होणारा असून यातून गट तट निर्माण होण्याची शक्यता दिसून येते. तालुक्यातील ग्रामपंचायत निवडणूक मध्ये ज्येष्ठ नेते अण्णासाहेब देशमुख, बाळासाहेब पाटील हांडोग्रीकर, तसेच दत्ता मोहिते, शिवाजी भोईटे, प्रवीण रणबागुल, काकासाहेब चव्हाण, तानाजी बोराडे ,ज्ञानेश्वर गीते, प्रताप देशमुख, प्रवीण खटाळ, रामकिसन गव्हाणे, चेतन बोराडे यांना आपापल्या परीने ग्रामपंचायत ताब्यात ठेवण्यासाठी प्रयत्न करावे लागणार आहेत.

# तुळजापूर येथील अरण्य गोवर्धन मठात गुरुपौर्णिमा साजरी

आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजापूर येथील अरण्य गोवर्धन मठात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. प्रारंभी मठाचे महंत अरण्य गुरु शिवारण्य यांनी दत्त मूर्तीला अभिषेक व पूजन केले. तसेच सर्व देवता गुरु शिष्य परंपरेतील सर्व गुरुंच्या समाधीवर अभिषेक करण्यात आला. प्रतीवर्षाप्रमाणे संपूर्ण समाज मंदिर वाड्याला प्रदक्षणा करून कुंडाची पूजा करण्यात आली. यावेळी राजेंद्र अमृतराव, शिवाजी अमृतराव, बाळकृष्ण अमृतराव आदी उपस्थित होते.



# भाई उद्धवराव पाटील प्रशालेत गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी



आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव शहरातील भाई उद्धवराव पाटील प्रशालेत महर्षी व्यास यांचा जन्मदिवस म्हणजेच '' गुरुपौर्णिमा '' अत्यंत उत्साहात व भक्तिभावाने साजरी करण्यात आली. गुरु-शिष्य परंपरेचा सन्मान करणारा हा दिवस विद्यार्थ्यांच्या मनामध्ये सद्गुणांची, शिस्तीची आणि संस्कारांची जाणीव निर्माण करणारा ठरला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रताप माळी सर होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रशालेचे जेष्ठ शिक्षक एच. व्ही. घेवारे सर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात भाई बळवंत बप्पा घोगरे यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. यावेळी सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे वृक्ष, पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमासाठी प्रशालेतील सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता १० वीच्या कु. वैष्णवी आडसूळ व कु. साक्षी सुरवसे यांनी केले, तर आभार प्रदर्शन कु. साक्षी सुरवसे यांनी केले.